## आजचे पंचांग

दिनांक : १४ जुलै २०२६ वार : मंगळवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : अमावस्या तिथी (दुपारी ०३:१२ पर्यंत) त्यानंतर प्रथम तिथी नक्षत्र : पुनर्वसू नक्षत्र (१५ जुलै रात्री १२:०९ पर्यंत) त्यानंतर पुष्य नक्षत्र योग : व्याघात योग (सकाळी ११:५६ पर्यंत) त्यानंतर हर्षण योग करण : नागवा करण (दुपारी ०३:१२ पर्यंत)

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


### टीईटी पेपर फुटी प्रकरणातील आरोपींना न्यायालयीन कोठडी

**भिवंडी :** टीईटी पेपर फुटी प्रकरणात पोलीस कोठडीत अटक असलेल्या दोन आरोपींना सोमवारी भिवंडी न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आता पर्यंत १२ आरोपींना अटक करण्यात पोलीस यंत्रणेला यश आले असून या सर्वांची रवाणगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. मात्र या प्रकरणातील दोन मुख्य आरोपी अजूनही फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ वर्ष - १ अंक - २८६ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### वाहनाखाली कोण आहे का? खात्री न करता झोपलेल्या व्यक्तीच्या अंगावरून गाडी घातल्याने जागीच मृत्यू, वाहनचालकाला अटक




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** हडपसरकडून सासवडकडे जाताना दिवे घाटाच्या पायथ्याशी आंबेकर लॉन्सच्या समोरील बाजूस असलेल्या एका टपरीजवळ झोपलेल्या एका व्यक्तीच्या अंगावरून कारचे चाक गेल्याने त्याचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी (दि.१२) २.३० ते ३ च्या सुमारास घडली. याप्रकरणी वाहनचालकाला फुरसुंगी पोलिसांनी अटक केली आहे. चंदनकुमार गिरीजाशंकर गौतम (वय ३१ रा. जेजुरी ता. पुरंदर जी. पुणे) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाहनाखाली किंवा वाहनाजवळ कोणतीही व्यक्ती आहे किंवा नाही याची खात्री न करता निष्काळजीपणाने वाहन सुरू करून वाहनचालकाने निघण्याचा प्रयत्न केला.

मात्र वाहनाच्या समोरील बाजूस झोपलेल्या व्यक्तीच्या अंगावरून कारचे पुढचे चाक गेल्याने तो गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोमल जाधव करीत आहेत.

# विद्यार्थ्यांचा सन्मान जपण्यात सरकार अपयशी?

## सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणातून शिक्षण व्यवस्थेवर कठोर प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** विद्यार्थ्यांना वर्गात सर्वांसमोर अपमानित करणे अस्वीकार्य असून त्याचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, असे स्पष्ट निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवत देशाच्या शिक्षण व्यवस्थेसमोर गंभीर प्रश्न उभे केले आहेत. न्यायालयाच्या या टिप्पणीमुळे केवळ शिक्षकांच्या वर्तनावरच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मानसिक सुरक्षिततेसाठी प्रभावी धोरणे राबवण्यात सरकार आणि शिक्षण प्रशासन किती गंभीर आहे, यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विद्यार्थ्याच्या आत्महत्येशी संबंधित प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी स्पष्ट केले की, बदलत्या काळात विद्यार्थ्यांचा सार्वजनिक अपमान सहन केला जाऊ शकत नाही. आमच्या काळातील पद्धती आजच्या विद्यार्थ्यांवर लादता येणार नाहीत, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांच्या सन्मानाला सर्वोच्च प्राधान्य दिले.

या प्रकरणात बचाव पक्षाने आत्महत्येसाठी इतर कारणे असल्याचा युक्तिवाद केला असला, तरी न्यायालयाने स्पष्ट संदेश दिला की, शिस्तीच्या नावाखाली विद्यार्थ्यांचा अपमान करण्याची कोणालाही मुभा नाही. या




निरीक्षणातून सरकारलाही काही अस्वस्थ करणारे प्रश्न समोर येतात. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी प्रभावी समुपदेशन व्यवस्था किती ठिकाणी उपलब्ध आहे? शिक्षकांना विद्यार्थ्यांशी संवेदनशील संवादाचे प्रशिक्षण किती संस्थांमध्ये दिले जाते? विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या वाढत्या घटनांनंतरही राष्ट्रीय स्तरावर ठोस प्रतिबंधात्मक धोरण का दिसत नाही?

सर्वोच्च न्यायालयाने कायदेशीर निरीक्षण नोंदवले असले, तरी त्यामागचा व्यापक संदेश स्पष्ट आहेविद्यार्थ्यांचा सन्मान आणि मानसिक सुरक्षितता ही केवळ शिक्षकांची नव्हे, तर सरकार आणि संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची घटनात्मक व नैतिक जबाबदारी आहे. हा इशारा गांभीर्याने घेतला नाही, तर विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष भविष्यात आणखी गंभीर सामाजिक प्रश्न निर्माण करू शकते.

# बनावट मेसेजवर खुलासा झाला, पण SIR बाबत जनतेच्या मनातील संभ्रम कोण दूर करणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मतदार ओळखपत्र रद्द होणार असल्याचा बनावट व्हॉट्सअ‍ॅप संदेश खोटा असल्याचे स्पष्ट करत भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. मात्र, या खुलाशानंतरही एक मोठा प्रश्न कायम आहेविशेष सखोल पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेबाबत जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम सरकार आणि निवडणूक आयोग कधी आणि कसा दूर करणार?

व्हायरल संदेशात मतदारांची कागदपत्रे चुकीची असल्याचा दावा करत विशिष्ट मोबाईल क्रमांकावर संपर्क न केल्यास मतदार ओळखपत्र रद्द होईल, अशी भीती निर्माण करण्यात आली होती. निवडणूक आयोगाने हा संदेश पूर्णपणे बनावट असल्याचे स्पष्ट केले असून, अशा प्रकारचे संदेश किंवा व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक आयोगाकडून जारी करण्यात आलेले नाहीत, असे सांगितले आहे. मात्र, केवळ बनावट संदेशाचा इन्कार करून प्रश्न संपत नाही. देशभरात डखठ प्रक्रियेबाबत अनेक नागरिकांच्या मनात अजूनही प्रश्न आहेत. कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत? पडताळणीची प्रक्रिया नेमकी कशी होणार? कोणाचे नाव कोणत्या परिस्थितीत मतदार यादीतून वगळले जाऊ शकते? चुकीची माहिती पसरू नये यासाठी अधिकृत जनजागृती मोहीम कितपत प्रभावी आहे? या प्रश्नांची स्पष्ट आणि सर्वसामान्यांना समजेल अशी उत्तरे अद्याप अनेकांना मिळालेली नाहीत.

अशा माहितीच्या अभावामुळेच अफवा, बनावट संदेश आणि सायबर फसवणुकीला खतपाणी मिळत असल्याची टीका होत आहे. नागरिकांच्या मनातील संभ्रम वेळेत दूर करण्यात प्रशासन अपयशी ठरल्यास लोकशाही प्रक्रियेवरील विश्वासालाच धक्का बसू शकतो, अशीही चिंता व्यक्त केली जात आहे.

बनावट संदेशांवर कारवाई करणे जितके आवश्यक आहे, तितकेच अधिकृत, पारदर्शक आणि सातत्यपूर्ण संवादाद्वारे मतदारांचा विश्वास दृढ करणेही सरकार आणि निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. अन्यथा, प्रत्येक अफवेनंतर खुलासा करण्याची वेळ येत राहील आणि संभ्रमाचे वातावरण कायम राहील.

# तीन आठवड्यांनंतर पाठिंबा; विद्यार्थी आंदोलनात उद्धव ठाकरे उशिरा उतरले का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** दिल्लीच्या जंतरमंतरवर नीट पेपरफुटी, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि शिक्षण व्यवस्थेतील कथित भ्रष्टाचाराविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाला जवळपास तीन आठवडे उलटल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने अखेर जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यामुळे एक राजकीय प्रश्न चर्चेत आला आहेहा पाठिंबा योग्य वेळी मिळाला की खूप उशिरा?

उद्धव ठाकरे यांनी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि विद्यार्थी कार्यकर्ते अभिजित दिपके यांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर करत केंद्र सरकारवर टीका केली. त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री यांच्या जबाबदारीवर प्रश्न उपस्थित केले आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचा आरोप केला.

मात्र, आंदोलन सुरू झाल्यानंतर अनेक दिवस महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्षांकडून ठोस भूमिका दिसून आली नव्हती. विद्यार्थी, पालक आणि सामाजिक कार्यकर्ते सातत्याने आवाज उठवत असताना प्रमुख विरोधी पक्षांकडून रस्त्यावर उतरण्यास विलंब का झाला, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर तत्काळ भूमिका घेणे हे प्रभावी विरोधकाचे लक्षण मानले जाते. त्यामुळे पाठिंबा स्वागतार्ह असला, तरी तो आंदोलनाच्या सुरुवातीलाच मिळाला असता, तर त्याचा राजकीय आणि सामाजिक प्रभाव अधिक व्यापक झाला असता, अशी चर्चाही सुरू आहे. आता उद्धव ठाकरे यांच्या पाठिंब्यानंतर इतर विरोधी पक्षही या आंदोलनात सक्रियपणे सहभागी होतात का, की हा पाठिंबा केवळ निवेदनांपुरताच मर्यादित राहतो, याकडे देशभरातील विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष लागले आहे.

# महागाईचा भडका; जूनमध्ये किरकोळ महागाई ४.३८% वर, १७ महिन्यांनंतर आरबीआईची 'लक्ष्मण रेषा' पार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** अन्नधान्य, भाजीपाला, इंधन आणि वाहतूक खर्चात झालेल्या वाढीचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होताना दिसत आहे. जून २०२६ मध्ये देशातील किरकोळ महागाई दर वाढून ४.३८ टक्क्यांवर पोहोचला आहे. गेल्या १७ महिन्यांतील ही पहिलीच वेळ आहे, जेव्हा महागाईने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ने निश्चित केलेल्या ४ टक्क्यांच्या लक्ष्य पार केले आहे.

केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने (MoSPI) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, मे २०२६ मध्ये किरकोळ महागाई ३.९३ टक्के होती. त्यानंतर जूनमध्ये त्यात लक्षणीय वाढ झाली.

**अन्नधान्याच्या वाढत्या किमतींनी बिघडवले घरगुती बजेट**

महागाई वाढण्यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे अन्नपदार्थांच्या किमतीत झालेली वाढ. जूनमध्ये अन्न महागाई दर ५.३२ टक्क्यांवर पोहोचला, जो मे महिन्यात ४.७८ टक्के होता. यामध्ये ग्रामीण भागातील अन्न महागाई ५.४५ टक्के, तर शहरी भागातील महागाई ५.०९ टक्के नोंदवण्यात आली.

काही भाज्यांच्या किमती कमी झाल्यामुळे ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. बटाट्याच्या किमतीत जूनमध्ये २०.३४ टक्क्यांची घट झाली. मे महिन्यात ही घट २३.७१ टक्के होती. टोमॅटोच्या किमतीत ३१.९२ टक्क्यांची घट झाली. गेल्या वर्षी याच काळात टोमॅटोच्या किमतीत ४८ टक्क्यांहून अधिक वाढ झाली होती. मात्र, इतर खाद्यपदार्थांच्या किमती वाढल्यामुळे या घटेचा सर्वसामान्यांना फारसा फायदा झाला नाही. महागाईचा परिणाम केवळ स्वयंपाकघरापुरता मर्यादित राहिलेला नाही. पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीमुळे वाहतूक खर्चातही मोठी वाढ झाली आहे.

# निवडणुकीत 'लाडक्या', पडताळणीनंतर 'अपात्र'?

## ९२ लाख महिलांची नावे वगळल्याने सरकारच्या मोफत योजनांच्या विश्वासार्हतेवर प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून तब्बल ९२ लाख महिलांची नावे वगळण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर राज्य सरकारच्या सर्वात महत्त्वाकांक्षी कल्याणकारी योजनेच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. निवडणुकीपूर्वी मोठ्या प्रमाणावर लाभार्थी नोंदवले गेले आणि आता पडताळणीनंतर जवळपास चारपैकी एकापेक्षा अधिक महिलांना योजनेबाहेर काढण्यात आल्याने विरोधकांनी सरकारवर राजकीय हेतूने योजना राबवल्याचा आरोप केला आहे.

काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी हा निर्णय महिलांच्या विश्वासघाताचा असल्याची टीका केली. त्यांचा प्रश्न सरळ आहेजर या महिला सुरुवातीपासूनच अपात्र होत्या, तर त्यांना लाभ का देण्यात आला? आणि जर त्या पात्र होत्या, तर आता त्यांची नावे का वगळण्यात आली?

उपलब्ध माहितीनुसार, वगळण्यात आलेल्या सुमारे ६२ लाख महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नव्हती. मात्र, याच मुद्द्यावर प्रशासनालाही उत्तर द्यावे लागणार आहे. लाभार्थ्यांना वेळेवर सूचना देण्यात आल्या होत्या का? ई-केवायसी प्रक्रिया सर्वांसाठी सुलभ करण्यात आली होती का? ग्रामीण आणि डिजिटल सुविधांपासून वंचित महिलांपर्यंत शासनाची यंत्रणा प्रभावीपणे पोहोचली होती का?

विरोधकांचा आरोप आहे की, निवडणुकीच्या काळात मोठ्या प्रमाणावर लाभार्थी दाखवून राजकीय संदेश दिला गेला; आता पडताळणीच्या नावाखाली मोठ्या संख्येने महिलांना बाहेर काढले जात आहे. दुसरीकडे, सरकारचा दावा असा असू शकतो की, पात्र लाभार्थ्यांनाच लाभ मिळावा म्हणून पडताळणी आवश्यक होती. या दोन भूमिकांमधील सत्य स्पष्ट करण्याची जबाबदारी सरकारवरच आहे. योजनेवर हजारो कोटी रुपयांचा सार्वजनिक निधी खर्च झाला आहे. त्यामुळे केवळ लाभार्थ्यांची संख्या सांगणे पुरेसे नाही; सुरुवातीच्या नोंदणी प्रक्रियेत कोणत्या त्रुटी राहिल्या, पडताळणीत इतक्या मोठ्या प्रमाणात नावे का बाद झाली आणि भविष्यात अशा चुका टाळण्यासाठी कोणती सुधारणा केली जाणार, याची पारदर्शक माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक आहे.

या प्रकरणाने एक व्यापक प्रश्नही पुन्हा समोर आणला आहेमोठ्या प्रमाणावर जाहीर केल्या जाणाऱ्या मोफत किंवा थेट लाभाच्या योजना या काटेकोर नियोजनावर आधारित असतात की, त्यांची अंमलबजावणी नंतर बदलणाऱ्या निकषांवर अवलंबून राहते? कोणतीही कल्याणकारी योजना नागरिकांचा विश्वास जिंकते तो घोषणांमुळे नव्हे, तर सातत्यपूर्ण, पारदर्शक आणि न्याय्य अंमलबजावणीमुळे.

९२ लाख महिलांची नावे वगळल्याने आता सरकारसमोर केवळ प्रशासकीय नव्हे, तर विश्वासार्हतेचेही मोठे आव्हान उभे राहिले आहे. या महिलांपैकी किती जणी खरोखर अपात्र होत्या, किती जणी केवळ प्रक्रियात्मक कारणांमुळे वगळल्या गेल्या आणि त्यांना पुन्हा संधी दिली जाणार का, याची स्पष्ट उत्तरे येणे आवश्यक आहे. कारण लोकशाहीत कल्याणकारी योजनांचे यश लाभार्थ्यांच्या संख्येने नव्हे, तर त्या योजनांवरील जनतेच्या विश्वासाने मोजले जाते.

# राम मंदिर देणगीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा हस्तक्षेप; तपासावर विश्वासाचा प्रश्न का निर्माण झाला?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अयोध्येतील श्रीराम मंदिरातील कथित देणगी चोरी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, उत्तर प्रदेश सरकार आणि श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टला नोटिसा बजावत विशेष तपास पथकाकडून (SIT) प्रगती अहवाल मागवला आहे. न्यायालयाचा हा आदेश केवळ प्रक्रियात्मक टप्पा नसून, देशातील सर्वात संवेदनशील धार्मिक संस्थांपैकी एका संस्थेशी संबंधित प्रकरणाच्या तपासाबाबत सार्वजनिक विश्वास अबाधित राहावा, यासाठी न्यायालय स्वतः लक्ष ठेवत असल्याचे संकेत मानले जात आहेत.

या प्रकरणात याचिकाकर्त्यांनी केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (CBI) चौकशीची मागणी केली आहे. त्यावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारच्या डखढ ला तपासाची सद्यस्थिती, तपासात सहभागी अधिकाऱ्यांची माहिती आणि तपासाची प्रगती सादर करण्याचे निर्देश दिले. केंद्र सरकारने हा अहवाल सीलबंद लिफाफ्यात सादर केला जाईल, असे न्यायालयाला सांगितले आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, सरकारच्या विनंतीनंतरही न्यायालयाने मंदिर ट्रस्टला नोटीस बजावण्याचा निर्णय पुढे ढकलला नाही. त्याचप्रमाणे, तपास सुरू असल्याचे नमूद करत याचिकाकर्त्यांना स्टेटस रिपोर्टची प्रत देण्यासही न्यायालयाने सध्या नकार दिला. यावरून न्यायालय तपासात थेट हस्तक्षेप न करता त्याच्या प्रगतीवर न्यायालयीन देखरेख ठेवत असल्याचे स्पष्ट होते.

तथापि, या घडामोडी काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करतात. देशातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या धार्मिक स्थळाशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांनंतर तपासाबाबत इतकी शंका निर्माण का



झाली की प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले? सार्वजनिक विश्वास दृढ करण्यासाठी तपास प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आवश्यक होती का? या प्रश्नांची उत्तरे येत्या सुनावण्यांमध्ये अधिक स्पष्ट होऊ शकतात.

लोकशाहीत कोणत्याही तपासाची विश्वासार्हता ही केवळ निष्कर्षांवर अवलंबून नसते; ती तपास प्रक्रियेवरील जनतेच्या विश्वासावरही अवलंबून असते. अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये सरकार, तपास यंत्रणा आणि संबंधित संस्थांनी पारदर्शकता व उत्तरदायित्वाची सर्वोच्च पातळी राखणे अपेक्षित असते.

सर्वोच्च न्यायालयाने अद्याप सरकारच्या तपासावर अविश्वास व्यक्त केलेला नाही किंवा तपास अपयशी ठरल्याचे म्हटलेले नाही. मात्र, न्यायालयाने केंद्र, राज्य सरकार आणि मंदिर ट्रस्टला नोटिसा बजावून तपासाचा सविस्तर अहवाल मागवल्याने या प्रकरणाकडे न्यायालय अत्यंत गांभीर्याने पाहत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आता २० जुलैच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्या दिवशी सादर होणाऱ्या अहवालातून तपासाची दिशा, प्रगती आणि पुढील न्यायालयीन भूमिका स्पष्ट होईल. तोपर्यंत या प्रकरणात कोणताही ठाम निष्कर्ष काढण्यापेक्षा न्यायालयीन प्रक्रियेची प्रतीक्षा करणेच अधिक योग्य ठरेल. मात्र, या प्रकरणाने एक गोष्ट अधोरेखित केली आहेदेशातील कोणतीही संस्था, कितीही प्रतिष्ठित असली तरी, आर्थिक व्यवहारांबाबत पारदर्शकता आणि कायद्यापुढील उत्तरदायित्व याला पर्याय नाही.

## संपादकीय

### कर शहरं भरतात निर्णय मंत्रालय घेतं! मग स्थानिक स्वराज्य नेमकं कुठे आहे?

भारताच्या आर्थिक नकाशावर महाराष्ट्राची शहरं ही केवळ लोकसंख्येची केंद्रे नाहीत; ती राज्याच्या महसुलाची प्रमुख इंजिने आहेत. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, ठाणे, नवी मुंबई, नाशिक आणि नागपूर या शहरांतील उद्योग, आयटी, उत्पादन, सेवा आणि बांधकाम क्षेत्र राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार देतात. महाराष्ट्राचा २०२५-२६ चा अर्थसंकल्प सुमारे ७ लाख कोटींचा होता, तर २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात राज्याचे स्वतःचे कर उत्पन्न सुमारे ४.१५ लाख कोटी इतके अपेक्षित आहे. यातील सर्वात मोठा हिस्सा राज्य जीएसटीचा असून त्यानंतर स्टॅम्प ड्युटी, नोंदणी शुल्क, व्हॅट, उत्पादन शुल्क आणि वाहन कर यांचा क्रम लागतो. मात्र येथेच सर्वात मोठा प्रश्न उभा राहतो. या महसुलात सर्वाधिक योगदान देणाऱ्या शहरांना त्यांच्या विकासासाठी किती हिस्सा परत मिळतो? या प्रश्नाचे अधिकृत, शहरनिहाय उत्तर सरकारकडे सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध नाही. याच कारणामुळे पारदर्शकतेची मागणी अधिक तीव्र होते. भारतीय राज्यघटनेतील ७४ वी घटनादुरुस्ती ही केवळ महानगरपालिका निवडणुकांसाठी करण्यात आलेली नव्हती. तिचा मूळ हेतू स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक आणि प्रशासकीय स्वायत्तता देणे हा होता. त्यासाठी प्रत्येक राज्यात राज्य वित्त आयोग स्थापन करून महसूल वाटपाची तत्त्वे निश्चित करण्याची घटनात्मक तरतूद करण्यात आली. परंतु वास्तव वेगळं आहे. अनेक वर्षांपासून राज्य वित्त आयोगांच्या शिफारशींची अंमलबजावणी विलंबाने होत असल्याची टीका होत आली आहे. नुकत्याच सहाव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्याच्या कर महसुलातून अधिक सूत्रबद्ध आणि मोठा वाटा देण्याची शिफारस केली असून आर्थिक लेखापरीक्षण अधिक कठोर करण्याचाही आग्रह धरला आहे. म्हणजेच प्रश्न केवळ विरोधकांचा नाही; राज्याच्या वित्तीय व्यवस्थेचा अभ्यास करणाऱ्या आयोगालाही विद्यमान प्रणालीत सुधारणा आवश्यक वाटत आहेत.

दुसरीकडे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (CAG) यांनी महाराष्ट्राच्या वित्तीय व्यवस्थेबाबत महसुली तूट, वाढते बांधील खर्च, अर्थसंकल्पीय नियोजनातील त्रुटी, ऑफ-बजेट कर्ज आणि निधी व्यवस्थापनातील पारदर्शकतेबाबत चिंता व्यक्त केली आहे. अशा परिस्थितीत एक मूलभूत प्रश्न विचारलाच पाहिजे राज्याची आर्थिक परिस्थिती तणावाखाली असेल, तर शहरांच्या पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक आणखी मागे पडणार नाही का? आज भारताच्या G¦P मध्ये शहरी भागाचे योगदान ६० टक्क्यांहून अधिक असल्याचे विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अभ्यास सातत्याने दर्शवतात. आर्थिक वाढ शहरांतून होते, पण आर्थिक निर्णयांचे केंद्रीकरण मंत्रालयात राहते. हीच विसंगती आहे. याचा अर्थ राज्य सरकारने सर्व पैसा शहरांवरच खर्च करावा, असा अजिबात नाही. ग्रामीण भाग, मागास प्रदेश, सिंचन, शेती, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांवर खर्च करणे ही राज्याची घटनात्मक जबाबदारी आहे. पण त्याच वेळी कर निर्माण करणाऱ्या शहरांनाही पुरेशा आणि पूर्वनियोजित निधीची हमी असली पाहिजे. आज परिस्थिती अशी आहे की अनेक महानगरपालिका मोठ्या पाणीपुरवठा योजना, सांडपाणी प्रक्रिया, सार्वजनिक वाहतूक, पूरनियंत्रण आणि रस्त्यांच्या प्रकल्पांसाठी राज्याच्या मंजुरीची वाट पाहतात. हा प्रश्न केवळ पैशाचा नाही. हा प्रश्न स्थानिक स्वराज्याच्या विश्वासार्हतेचा आहे. जर प्रत्येक मोठ्या निर्णयासाठी महानगरपालिकांना मंत्रालयाकडे जावं लागत असेल, तर त्या खऱ्या अर्थाने स्वायत्त संस्था कशा? सुधारणा स्पष्ट आहेत

* राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी वेळेत आणि पूर्णपणे लागू करणे.
* शहरनिहाय महसूल विरुद्ध खर्च असा वार्षिक सार्वजनिक अहवाल प्रसिद्ध करणे.
* महानगरपालिकांना स्थिर महसूल स्रोत उपलब्ध करून देणे.
* महानगरपालिका रोखे, मालमत्ता कर सुधारणा आणि डिजिटल महसूल व्यवस्थापन अधिक प्रभावी करणे.
* आणि सर्वात महत्त्वाचं कर भरणाऱ्या नागरिकांना त्यांच्या शहराच्या आर्थिक स्थितीचा पारदर्शक हिशोब देणे.

लोकशाहीत कर हा फक्त पैसा नसतो; तो विश्वासाचा करार असतो. म्हणून आजचा खरा प्रश्न सरकारविरोधात किंवा महानगरपालिकांविरोधात नाही. प्रश्न इतकाच आहे ज्या शहरांमुळे राज्याची तिजोरी भरते, त्या शहरांना त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक स्वायत्तता कधी मिळणार?

# भारताच्या प्रगतीसाठी संशोधन आणि नवोपक्रमावर भर द्या : पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील


## पीसीयूमध्ये आंतरराष्ट्रीय 'मास्टरमाइंड मीट-२०२६'चे उद्घाटन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** भारताच्या औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीसाठी संशोधन व नवोपक्रमावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) आगामी काळात स्टार्टअप-केंद्रित विद्यापीठ म्हणून विकसित केले जाईल. हरित ऊर्जा, हवामान बदल, शाश्वत शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक सहकार्य या क्षेत्रांतील संशोधनातून नव्या संधी निर्माण करून 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेला गती देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते (ता. मावळ) येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात आयोजित 'आंतरराष्ट्रीय मास्टरमाइंड मीट (आयएम-३) २०२६'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, संशोधन व विकास संचालक डॉ. भरत काळे, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक डॉ. राजेंद्र जगदाळे, मायक्रोलिन (अमेरिका) चे संस्थापक डॉ. अशोक जोशी, युनिव्हर्सिटी ऑफ न्यूकॅसल (ऑस्ट्रेलिया) येथील प्रा. अजयन विनू, मिड स्वीडन विद्यापीठाचे डॉ. कौस्तुभ दलाल, सेंट्रल इलेक्ट्रोकेमिकल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. विजय मोहनन पिल्लई, भारतीय विज्ञान संस्था (आयआयएससी), बेंगळुरू येथील प्रा. पी. एस. अनिल कुमार, टाटा केमिकल्सचे ग्लोबल हेड (इनोव्हेशन) डॉ. रिचर्ड लोबो, सी-डॅकचे डॉ. कृष्णांजन भट्टाचार्य, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. विलास खरचे, दक्षिण आफ्रिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ व्हेंडा येथील डॉ. फुलुफ्हेलो



नेमांगवेले.

तसेच डॉ. सचिन रोंडिया यांच्यासह देश-विदेशातील शास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योग प्रतिनिधी आणि धोरणकर्ते उपस्थित होते. यावेळी परिषदेच्या ॲबस्ट्रॅक्ट स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी विद्यापीठातील संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी उभारण्यात आलेल्या सक्षम परिसंस्थेची माहिती देत विद्यार्थी व संशोधकांनी समाजोपयोगी संशोधनावर भर द्यावा, असे आवाहन केले.

परिषदेतील विविध तांत्रिक सत्रांमध्ये हरित ऊर्जा, हायड्रोजन इंधन, प्रगत नॅनोमटेरियल्स, ऊर्जा साठवणूक, लिथियम-आयन बॅटरी, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, ब्लॉकचेन, स्मार्ट कृषी तंत्रज्ञान, सौरऊर्जा, भाषा मॉडेल्स आणि आधुनिक तंत्रज्ञानातील संशोधन या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

ही परिषद पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. भरत काळे यांनी केले.

## पिंपरी-चिंचवड बार असोसिएशनतर्फे ॲड. साधना बोरकर यांचा निरोप समारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. साधना बोरकर यांच्या निरोप समारंभाचे आयोजन शुक्रवारी (११ जुलै) नेहरूनगर, पिंपरी येथील न्यायालयाच्या बार रूममध्ये करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज होते. यावेळी महाराष्ट्र अँड गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. विकास ढगे पाटील, माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतीश गोरडे, माजी अध्यक्ष ॲड. संजय दातीर पाटील, ॲड. एस. बी. चांडक, ॲड. सुहास पडवळ, ॲड. सुनील कडूसकर, ॲड. जे. के. काळभोर, ॲड. आतिश लांडगे, ॲड. राजेश पुणेकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ॲड. विकास ढगे पाटील, ॲड. गौरव वाळुंज, ॲड. सतीश गोरडे आणि ॲड. संजय दातीर पाटील यांच्या हस्ते ॲड. साधना बोरकर यांचा सत्कार करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतीश गोरडे यांनी ॲड. बोरकर यांच्या सेवाभावी वृत्ती, कर्तव्यनिष्ठा आणि न्यायव्यवस्थेप्रती असलेल्या समर्पणाचे कौतुक केले. पक्षकारांना न्याय मिळावा, दुर्बल घटकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे आणि कायद्याचे राज्य अधिक सक्षम व्हावे यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे कार्य केल्याचे त्यांनी नमूद केले. ॲड. सुहास पडवळ यांनीही ॲड. बोरकर यांच्या कर्तव्यनिष्ठा, संवेदनशीलता, अभ्यासूवृत्ती आणि समाजाभिमुख कार्यपद्धतीचा गौरव केला. न्याय हा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे, ही त्यांची भूमिका त्यांच्या कार्यातून सातत्याने दिसून आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ॲड. विकास ढगे पाटील, ॲड. एस. बी. चांडक, ॲड. सुनील कडूसकर, ॲड. जे. के. काळभोर, ॲड. रामराजे भोसले, ॲड. सचिन थोपटे, ॲड. आतिश लांडगे, ॲड. राजेश पुणेकर, ॲड. किरण पवार, ॲड. विकास पोटघन, ॲड. योगेश थांबा, ॲड. प्रतीक जगताप, ॲड. जयश्री कुंटे, ॲड. कांता गोरडे, ॲड. रूपाली वाघिरे, ॲड. अनिल शिंदे, ॲड. सुदाम साने आणि ॲड. संजना माने यांनी मनोगत व्यक्त करून ॲड. बोरकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. राठोड यांनीही ॲड. बोरकर यांच्या प्रामाणिक, अभ्यासू आणि कर्तव्यदक्ष कार्यशैलीचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. मंगेश खराबे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. विश्वेश्वर काळजे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ॲड. अनिल पवार, ॲड. राकेश जैद, ॲड. शंकर घंघाळे, ॲड. अरविंद नखाते, ॲड. सी. एम. माने, ॲड. धीरज कुचेरिया, ॲड. आशिष गोरडे, ॲड. शंकर पल्ले आणि ॲड. प्रसन्न लोखंडे यांनी सहकार्य केले.

## शिक्षक हे समर्पण भावनेने काम करतात : महापौर रवी लांडगे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** भोसरी मधील महात्मा फुले विद्यालय आणि पिंपरी चिंचवड शहरातील शासकीय अनुदानित शाळेतील शिक्षक हे समर्पण भावनेने काम करतात हे अभिमानास्पद आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी केले.

भोसरी येथील महात्मा फुले जागृती संस्थेच्या महात्मा फुले विद्यालयातील क्षितिजय नप्ते याने इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे, त्याचा व इतर यशस्वी विद्यार्थ्यांचा आणि या विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका मंगल आहेर - गावडे या सर्वांचा सत्कार महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ माजी नगरसेवक व भोसरी येथील महात्मा फुले जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष वसंत लोंढे, नगरसेवक विराज लांडे, सोनाली गव्हाणे, माई पठारे, संस्थेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत रासकर, शिवलिंग ढवळेश्वर, दिगंबर ढोकळे, मुख्याध्यापक सुलभा चव्हाण, मोहन वाघुले, सुलोचना वसंत लोंढे, शिक्षक, यशस्वी विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते. तत्पूर्वी गुणवंत विद्यार्थ्यांची भोसरी गावठाण परिसरातून मिरवणूक काढण्यात आली. संस्थेचे उपाध्यक्ष श्याम लोंढे, अनिल लोंढे, सोमनाथ रासकर, सचिव संतोष लोंढे, उपसचिव संदीप लोंढे, खजिनदार वृषभ रासकर, सह खजिनदार दीपक लोंढे, महेश लोंढे, हिशोब तपासणीस विजय लोंढे, सह हिशोब तपासणीस अतुल रासकर, सभासद तुषार लोंढे, संकेत लोंढे, सिद्धेश लोंढे, अमित लोंढे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला होता. यावेळी महापौर रवी लांडगे यांनी सांगितले की, या संस्थेचे अध्यक्ष नाना लोंढे हे आमचे गुरू आहेत. त्यांनी कामगार, उद्योग, सहकार, व्यापार, अध्यात्म, राजकीय अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. आता त्यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती करायचे ठरवले आहे. भोसरी मधील विद्यार्थी आता शहरात शैक्षणिक क्रांती करतील असा विश्वास आहे. मी देखील वाबळेवाडी येथील दत्तात्रय वारे गुरुजी यांच्या शाळेचा आदर्श डोळे पुढे ठेवून वैयक्तिक खर्चाने एक शाळा विकसित करीत आहे. वाबळेवाडीतील शाळेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १३२ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे शाळा बाह्य शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसा पथदर्शी प्रकल्प म्हणून काम सुरू केले आहे. आगामी काळात पिंपरी चिंचवड शहर गुणवंतांचे शहर म्हणून नावारूपाला येईल असा विश्वास महापौर रवी लांडगे यांनी यावेळी व्यक्त केला.

## लाखणगाव विद्यालयाला चार्जेबल साऊंड सिस्टिमची भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** टीजीएफ फाउंडेशनच्या वतीने आयोजित मोफत पाठ्यपुस्तक वितरण उपक्रमाच्या निमित्ताने आंबेगाव तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल, लाखणगाव या विद्यालयाला चार्जेबल साऊंड सिस्टिम भेट देण्यात आली.

युवा उद्योजक तथा काठापूर खुर्द येथील सागर दांगट यांनी विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना मिळावी तसेच त्यांना प्रभावी व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने उच्च दर्जाची बोट कंपनीची चार्जेबल साऊंड सिस्टिम, मायक्रोफोन व डिजिटल सुविधांसह स्वखर्चाने विद्यालयाला उपलब्ध करून दिली. ही साऊंड सिस्टिम विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल देसले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ गाडगे आणि उपाध्यक्ष प्रदीप रोडे-पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. याबाबतची माहिती मुख्याध्यापक अनिल देसले यांनी दिली.

यावेळी सागर दांगट यांनी भविष्यातही शाळेच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे



कौतुक करत विद्यालयाला दिलेल्या या उपयुक्त भेटीबद्दल त्यांचे आभार मानले.

# मोशी कचरा डेपो दुर्घटनेप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी; दोषींवर कारवाईचे आयुक्तांना बारणे यांचे पत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** मोशी येथील कचरा डेपो दुर्घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाल्याप्रकरणी दोषींवर तातडीने फौजदारी कारवाई करून संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि कालबद्ध चौकशी करण्यात यावी, अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी सोमवारी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त सूर्यवंशी यांना दिलेल्या पत्राद्वारे केली.

पत्रात बारणे यांनी नमूद केले आहे की, एवढी गंभीर दुर्घटना घडूनही संबंधित ठेकेदार, जबाबदार अधिकारी किंवा इतर संबंधितांवर अद्याप ठोस कारवाई झालेली दिसून येत नाही. घनकचरा व्यवस्थापनातील कथित निष्काळजीपणा आणि नियोजनातील त्रुटींमुळेच ही दुर्घटना घडल्याचा संशय असून त्याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.



शहरातील घनकचऱ्याची वेळेत आणि नियमानुसार विल्हेवाट न लावल्याने कचऱ्याचा प्रचंड साठा निर्माण झाल्याचा दावा करत त्यांनी वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प सुमारे एक ते दीड महिना बंद असल्याची माहिती समोर आल्याचे नमूद केले आहे. तसेच प्रकल्पाच्या परवानगीची मुदत संपल्यानंतर तो कोणत्या कायदेशीर आधारावर सुरू ठेवण्यात आला, याची चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मधील सुरक्षा तरतुदींचे पालन झाले का, प्रकल्पाची चिमणी कोसळल्यानंतर आवश्यक सुरक्षा उपाययोजना का करण्यात आल्या नाहीत, तसेच प्रकल्प बंद असतानाही कामगारांना कामावर का बोलाविण्यात आले, या मुद्द्यांची चौकशी करण्याची मागणी पत्रात करण्यात आली आहे.

दुर्घटनाग्रस्त इमारतीचे दोन मजले कथितरित्या अनधिकृत असल्याच्या वृत्तांचाही उल्लेख करत, अशा इमारतीला परवानगी कोणी दिली आणि त्यासाठी कोण जबाबदार आहे, याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२५ मध्ये दिलेल्या नोटिशीनंतरही आवश्यक उपाययोजना का राबविण्यात आल्या नाहीत, दुर्घटनेचे सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक करावे, तसेच संबंधित अधिकारी, ठेकेदार आणि जबाबदार व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणीही खासदार बारणे यांनी केली आहे.

मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृत कामगारांना न्याय मिळावा आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करून प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## संभाजीनगर-शाहूनगर एमआयडीसी वसाहतींच्या पुनर्विकासाचा मुद्दा ऐरणीवर

### उद्योगमंत्र्यांकडे धोरणाची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई / पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवडमधील संभाजीनगर आणि शाहूनगर येथील एमआयडीसीच्या जुन्या निवासी इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न विधानमंडळात उपस्थित करण्यात आला. येथील हजारो कष्टकरी व निवृत्त कामगारांना सुरक्षित आणि आधुनिक निवासव्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी 'युनिफाइड डेव्हलपमेंट कंट्रोल अँड प्रमोशन रेग्युलेशन्स' (यूडीसीपीआर) लागू करून पुनर्विकास धोरण राबविण्याची मागणी उद्योगमंत्र्यांकडे करण्यात आली.

चर्चेदरम्यान, अनेक इमारती जुन्या झाल्याने



रहिवाशांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. विशेषतः लिफ्टची सुविधा नसल्याने सहाव्या आणि सातव्या मजल्यावर राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, कष्टकरी आणि निवृत्त कामगारांना दररोज ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला.

या पार्श्वभूमीवर एमआयडीसीच्या निवासी वसाहतींसाठी यूडीसीपीआरच्या तरतुदी लागू करून पुनर्विकासाला गती द्यावी, अशी मागणी करण्यात आली. त्यावर उद्योगमंत्र्यांनी या प्रस्तावावर एमआयडीसीकडून सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली.

या पुनर्विकास प्रक्रियेमुळे जुन्या इमारतींतील रहिवाशांना अधिक सुरक्षित, आधुनिक आणि मूलभूत सुविधांनी युक्त घरे उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पत्नीच्या हत्येप्रकरणी फरार पतीला मंचर पोलिसांकडून अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** पत्नीची हत्या करून फरार झालेल्या आरोपी पतीला मंचर पोलीस ठाणे आणि पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने काही दिवसांत अटक केली. आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे येथे नातेवाईकांकडे लपून बसलेल्या आरोपीला गुप्त माहितीच्या आधारे ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी सपना दीपक पारधी (वय ३५) यांच्या हत्येप्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी किरण गंगाराम दंडोरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दीपक गेणबा पारधी (रा. वारुळवाडी, ता. जुन्नर; सध्या रा. थोरांदळे, ता. आंबेगाव) याने कौटुंबिक वादातून पत्नीवर चाकू आणि लोखंडी गजाने वार करून तिची हत्या केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेण्यात येत होता.

तपासादरम्यान आरोपी थोरांदळे येथे नातेवाईकांकडे लपल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली. न्यायालयाने आरोपीला १७ जुलै २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

प्राथमिक चौकशीत कौटुंबिक वादातून संतापाच्या भरात पत्नीवर चाकू आणि लोखंडी गजाने वार केल्याची कबुली आरोपीने दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज वाघमारे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रमोद धीरसागर, पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज वाघमारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार तसेच मंचर पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# लोणी येथील विद्यालयास उपमुख्यमंत्री कार्यालयातील अधिकाऱ्यांची भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव) : लोणी येथील श्री भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास उपमुख्यमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयातील सहसचिव व्यंकटेश भट, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे सहसचिव मंगेश शिंदे, गृह विभागाचे अवर सचिव बोरसे तसेच अन्य महिला अधिकाऱ्यांनी नुकतीच भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यालय परिसरात राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण उपक्रमाची तसेच तळ्याच्या विकासकामाची पाहणी केली.



या भेटीदरम्यान विद्यालयाचे प्राचार्य सुनील थोरात व सर्व शिक्षकवृंद यांनी मान्यवरांचे स्वागत केले. याप्रसंगी शाळेचे माजी विद्यार्थी, विकास प्रबोधिनीचे आधारस्तंभ व मार्गदर्शक तसेच महसूल विभागाचे सहसचिव कैलास गायकवाड, उपसरपंच राजू वाळुंज, संतोष पडवळ, प्रकाशजी वाळुंज, अरुण साकोरे, शिवाजी सिनलकर, बबन वाळुंज, पोलीस अकादमीचे पडवळ तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.

भेटीदरम्यान सहसचिव व्यंकटेश भट यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, जीवनात अनेक समस्या व अडचणी येतात; मात्र त्यांवर मात करूनच पुढे जावे लागते. अपयश आले तरी खचून न जाता सातत्याने प्रयत्न करत राहिल्यास यश निश्चित मिळते. कोणत्याही क्षेत्रात प्रगतीसाठी

# मंचरमध्ये अनधिकृत बांधकामप्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मंचर नगरपंचायतीची आवश्यक पूर्वपरवानगी न घेता अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी मंचर पोलिस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५२ व ५३ चे उल्लंघन केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी मंचर नगरपंचायतीचे स्थापत्य अभियंता संदीप दिलीप पवार (वय ३२) यांनी मंचर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादीनुसार, आकांक्षा ऋषीकेश चिखले, संजय जिजाबा थोरात, प्रियंका संजय थोरात, आत्माराम शंकर थोरात, कुसुम निवृत्ती वाळुंज आणि पृथ्वीराज शंकर थोरात (सर्व रा. मंचर, ता. आंबेगां) यांनी मौजे मंचर येथील सर्वे क्रमांक १२२/२ व १२३/२अ मधील सुमारे ५,१०० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जागेवर २५ मार्च २०२६ पूर्वी नगरपंचायतीची आवश्यक पूर्वपरवानगी न घेता बांधकाम केल्याचा आरोप आहे. या कृतीमुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील संबंधित तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी ९ जुलै २०२६ रोजी मंचर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार घोडे करीत आहेत. पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## 'काहींचा हिंदुत्ववाद सिझनेबल' : आमदार महेश लांडगेंवर सुषमा अंधारेंची अप्रत्यक्ष टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मोशी येथील कचरा डेपो दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत आमदार महेश लांडगे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली. यावेळी शहरप्रमुख चेतन पवार उपस्थित होते. पत्रकार परिषदेत बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, काहींचा हिंदुत्ववाद हा 'सिझनेबल' आहे. धर्माचा वापर सोयीनुसार केला जातो. अँटनी लॉरा कंपनीकडून पैसा मिळत असेल, तर अशा दुर्घटनांवर बोलायचे नाही का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# नगदवाडी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रामस्थांकडून सत्कार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील नगदवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेतील विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. ही माहिती केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला बोऱ्हाडे यांनी दिली.

यावेळी इयत्ता पाचवीतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थिनी शरण्या कांबळे हिचा तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेले आरोही शिंदे, सर्वेश बढे, अंजली बढे, कृष्णाली शिंदे, रुद्र कुतळ, सादिया अन्सारी आणि दयानंद भोर यांचा गौरव करण्यात आला. तसेच



नासा-इसरो प्रवेश परीक्षेसाठी पात्र ठरलेले मुस्कान शेख, रुद्र कुतळ, दयानंद भोर आणि आकाश राठोड यांचाही भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका आशा आरेकर यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास कांदळी गावचे शिक्षणप्रेमी तथा माजी आदर्श सरपंच बाळासाहेब बढे, ग्रामपंचायत सदस्य निलेश बढे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश बढे, उपाध्यक्ष भावना बढे तसेच अशोक बढे, रघुनाथ बढे, संगिता बढे, महेश बढे, संतोष बढे, दयानंद बढे, दिपाली जाधव, अक्षदा जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन शिक्षक मंगेश मेहेर, पंडित चौगुले, निलेश शेलार, विद्या वाघ आणि उज्ज्वला कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन मंगेश मेहेर यांनी केले, तर आभार निलेश शेलार यांनी मानले.

# शिरदाळे येथे वृक्षारोपण उपक्रम; पर्यावरण संवर्धनाचा संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील शिरदाळे येथे गावालगतच्या तलाव परिसराचे सुशोभीकरण आणि पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने वृक्षारोपण उपक्रम उत्साहात पार पडला. गावातील युवकांनी पुढाकार घेत आयोजित केलेल्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



शिरदाळे (ता. आंबेगाव) येथे आयोजित वृक्षारोपण उपक्रमात सहभागी झालेले मान्यवर आणि ग्रामस्थ.

कार्यक्रमास शिवऋण महाराष्ट्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष अक्षय बोऱ्हाडे, हुतात्मा बाबू गेनू प्रतिष्ठानचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष बाबाजी चासकर, चंद्रकांत जाधव, माजी सरपंच सागर जाधव-पाटील तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे उपस्थित मान्यवरांचा स्मृतिचिन्हाऐवजी प्रत्येकी एका रोपट्याने सन्मान करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या अभिनव उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी धामणी येथील सागदरा परिसरातील ऐतिहासिक खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या मार्गाच्या विकासासाठी ग्रामस्थांनी केलेल्या श्रमदानाचाही गौरव करण्यात आला. खोल दरीतील या मार्गावर भाविकांना ये-जा करण्यास अडचणी येत असल्याने गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक आणि महिलांच्या सहकार्याने सुरक्षित व सुकर रस्ता तयार करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी 'वृक्षवल्ली सोयरे ग्रुप'च्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतल्याची माहिती संदीप तांबे यांनी दिली.

# शिंगवे येथे बालिकेवरील कथित लैंगिक अत्याचारप्रकरणी जनआक्रोश मोर्चा; गाव बंद ठेवून कठोर कारवाईची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव कारखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिंगवे येथे चार वर्षीय बालिकेवरील कथित लैंगिक अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ रविवारी (दि. १२) ग्रामस्थांनी गाव बंद पाळत भव्य जनआक्रोश मोर्चा काढला. या मोर्चात हजारो नागरिक सहभागी झाले होते. आमदार गोपीचंद पडळकर, ह.भ.प. संग्राम बापू भंडारे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या २० वर्षीय संशयिताविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करून जलदगती न्यायालयात खटला चालवावा, अशी मागणी मोर्चाद्वारे करण्यात आली.

शिंगवे गावातून मोर्चाची सुरुवात झाली. ग्रामस्थ, महिला, युवक तसेच विविध सामाजिक व हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गावातील प्रमुख मार्गांवरून मोर्चा काढल्यानंतर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी आमदार गोपीचंद पडळकर यांनी राज्यात महिलांवरील आणि अल्पवयीन मुलींवरील अत्याचारांच्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली. संबंधित प्रकरणाचा जलदगती न्यायालयात सुनावणी होऊन दोषी आढळल्यास कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच अशा प्रकरणांमध्ये तातडीने आणि प्रभावी कायदेशीर कारवाई करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

ह.भ.प. संग्राम बापू भंडारे यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त करत मुलींच्या सुरक्षेबाबत समाजाने अधिक जागरूक राहण्याचे आवाहन केले. कायद्याच्या चौकटीत राहून संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलेश तुळे यांनी केले. नितीन वाव्हळ यांनी मनोगत व्यक्त केले, तर सूत्रसंचालन रुपेश तागड यांनी केले.

दरम्यान, घटनेच्या निषेधार्थ शिंगवे गावात दिवसभर बंद पाळण्यात आला. मोर्चादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# शिरदाळे येथील तलावात समाधानकारक पाणीसाठा; अतिवृष्टीमुळे पिकांना फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील शिरदाळे येथील गाव तलावात गेल्या आठवडाभर झालेल्या सलग पावसामुळे समाधानकारक पाणीसाठा झाला आहे. अवघ्या काही दिवसांच्या पावसात तलावातील पाण्याची पातळी लक्षणीय वाढल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

मे आणि जून हे दोन्ही महिने तुलनेने कोरडे गेल्यामुळे पाणीटंचाईची चिंता निर्माण झाली होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे परिसरातील तलाव, ओढे आणि इतर जलस्रोत मोठ्या प्रमाणात भरले असून अनेक ठिकाणी पाणवठे ओसंडून वाहत आहेत. एवढ्या कमी कालावधीत इतका मोठा



शिरदाळे (ता. आंबेगाव) येथील गाव तलावात झालेला समाधानकारक पाणीसाठा.

पाणीसाठा होणे दुर्मिळ असल्याचे गावातील ज्येष्ठ नागरिक सांगतात.

स्थानिकांच्या माहितीनुसार, तलावातील पाणीसाठा सुमारे २५ ते ३० टक्क्यांवरून वाढून ६० ते ६५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. तसेच शिवारातील अनेक लहान पाणवठे पूर्ण क्षमतेने भरल्याने जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची आणि चाऱ्याची चिंता काही प्रमाणात कमी झाली आहे. मात्र, या अतिवृष्टीचा फटका शेतीला बसला आहे. अनेक शेतांमध्ये पाणी साचल्याने नुकतीच केलेली पेरणी धोक्यात आली असून काही ठिकाणी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सततच्या पावसामुळे शेतांमध्ये पाणी साचून राहिल्याने शेतकरी चिंतेत असल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले.

# शिरूर नगरपरिषदेतील कथित मनमानी कारभाराविरोधात आमरण उपोषण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर :** शिरूर नगरपरिषदेतील कथित मनमानी कारभार, नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे होत असलेले दुर्लक्ष आणि विविध मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी संबंधित कार्यकर्ते व नागरिकांच्या वतीने आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

उपोषणकर्त्यांनी नगरपरिषद प्रशासनावर विविध विकासकामांमध्ये अनियमितता, निर्णय प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव तसेच नागरिकांच्या



मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला आहे. या सर्व बाबींची सखोल चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, तसेच प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, उपोषणस्थळी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, नागरिक आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी भेट देऊन उपोषणकर्त्यांना पाठिंबा दर्शविला. प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतरच उपोषण मागे घेण्याची भूमिका उपोषणकर्त्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, या प्रकरणी नगरपरिषद प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

# मंचर बाजार समितीत कांद्याची विक्रमी ३०,१६६ पिशव्यांची आवक; दरात किरकोळ घसरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** पावसाने काही दिवस उघडीप दिल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कांदा विक्रीसाठी बाजारात आणला. त्यामुळे रविवारी मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची तब्बल ३० हजार १६६ पिशव्यांची विक्रमी आवक झाली. आवक लक्षणीय वाढूनही बाजारभावात केवळ किरकोळ घसरण झाल्याची माहिती बाजार समितीचे सभापती निलेश थोरात यांनी दिली.

थोरात म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना कांदा बाजारात आणण्यात अडचणी येत होत्या. मात्र, पावसाने विश्रांती



घेतल्यानंतर मोठ्या प्रमाणावर कांदा विक्रीसाठी दाखल झाला. त्यामुळे बाजार समिती परिसरात दिवसभर शेतकरी व व्यापाऱ्यांची मोठी गर्दी होती. आवक वाढली असली तरी बाजारातील मागणी कायम असल्याने दरात मोठी घसरण झाली नसून केवळ किंचित घट झाली आहे.

बाजार समितीचे उपसभापती सचिन पानसरे यांनी जाहीर केलेल्या दरानुसार, प्रति १० किलो अपवादात्मक दर्जाच्या गोळे कांद्याला २७० ते ३०० असा सर्वाधिक भाव मिळाला. सुपर गोळे कांद्याला २४० ते २६०, सुपर मुक्कल कांद्याला २२० ते २३०, अवरेज मीडियम कांद्याला १८० ते २१०, गोल्टी व गोल्टा कांद्याला १४० ते १९०, तर बदला व चिंगळी कांद्याला ६० ते १२० दर मिळाला.

बाजार समिती प्रशासनाने शेतकऱ्यांना कांद्याची योग्य प्रतवारी करूनच विक्रीसाठी आणण्याचे आवाहन केले आहे.

दर्जेदार आणि चांगल्या प्रकारे पॅक केलेल्या कांद्याला अधिक चांगला भाव मिळत असल्याने प्रतवारी आणि पॅकिंगकडे विशेष लक्ष देण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

## सारांश वृत्त

### एआय वापरताना कंपन्या 'दुप्पट किंमत' मोजत आहेत; मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नडेला यांचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली/रेडमंड** : आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय)चा वाढता वापर करताना कंपन्या केवळ आर्थिक खर्चच करत नाहीत, तर स्वतःचा मौल्यवान व्यावसायिक डेटा आणि ज्ञानही गमावण्याचा धोका पत्करत आहेत, असा इशारा मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) सत्या नडेला यांनी दिला आहे. या स्थितीला त्यांनी 'रिव्हर्स इन्फॉर्मेशन पॅराडॉक्स' असे संबोधले.

नडेला यांच्या मते, एआय साधनांचा वापर करण्यासाठी कंपन्या प्रथम त्यासाठी शुल्क भरतात. त्यानंतर एआय मॉडेल अधिक सक्षम आणि अचूक बनविण्यासाठी स्वतःचा गोपनीय डेटा, अंतर्गत कार्यपद्धती आणि व्यावसायिक माहिती वापरतात. त्यामुळे कंपन्या प्रत्यक्षात 'दुप्पट किंमत' मोजत असल्याचे त्यांनी नमूद केले.

एआयचा वापर करताना कंपन्यांची ट्रेड सिक्रेट्स, संशोधन, ग्राहकविषयक माहिती आणि व्यवसायातील स्पर्धात्मक फायदा बाह्य एआय प्रणालींकडे जाण्याचा धोका असल्याने डेटा सुरक्षिततेकडे विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर नडेला यांनी कंपन्यांसाठी '५-सी' (५ Cs) धोरण सुचविले. त्यामध्ये स्वतःच्या डेटा आणि संगणकीय संसाधनांवर नियंत्रण (Control) ठेवणे, सुरक्षित अंतर्गत एआय क्षमता (Capability) विकसित करणे, कोणत्याही एका एआय मॉडेलवर अवलंबून न राहता पर्याय (Choice) उपलब्ध ठेवणे, खर्चाचे (Cost) प्रभावी व्यवस्थापन करणे आणि डेटा व ज्ञानाचा सुरक्षित वापर करून दीर्घकालीन मूल्यनिर्मिती (Compound) साधणे यांचा समावेश आहे.

## अदानी वीज प्रकल्पाविरोधात मोरबीत शेतकऱ्यांचा एल्गार; १४ जुलैला भव्य पदयात्रेची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मोरबी** : गुजरातमधील मोरबी जिल्ह्यात अदानी एनर्जी सोल्यूशन्स लिमिटेड (अएङ) च्या वीज पारेषण प्रकल्पाविरोधातील शेतकऱ्यांचे आंदोलन अधिक तीव्र झाले असून, आंदोलकांनी १४ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य पदयात्रा काढण्याची घोषणा केली आहे. जेतपार गावातील शेतकऱ्यांनी सरकारकडून मागण्यांबाबत लेखी निर्णय न मिळाल्याने आंदोलन कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.




आंदोलकांच्या माहितीनुसार, ही पदयात्रा मंगळवारी सकाळी ९ वाजता महेंद्रनगर चौकडी येथून सुरू होऊन सुमारे ३.५ किलोमीटर अंतर पार करत मोरबी जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचणार आहे. तेथे प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांचा विरोध अदानी एनर्जी सोल्यूशन्सच्या खावडा-हलवद या २४६ किलोमीटर लांबीच्या उच्चदाब वीज वाहिनी प्रकल्पासाठी उभारण्यात येणाऱ्या वीज टॉवर्सना आहे. या प्रकल्पासाठी सुपीक शेतीजमिनीचा वापर होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

आंदोलक शेतकऱ्यांनी खाजगी कंपन्यांच्या प्रकल्पांसाठी सुपीक शेतीजमिनीचा वापर टाळावा, वीज टॉवर्ससाठी बाजारभावाच्या चारपट नुकसानभरपाई द्यावी आणि केवळ तोंडी आश्वासनांऐवजी अधिकृत लेखी सरकारी निर्णय जाहीर करावा, अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

यापूर्वी जेतपार गावात शेतकऱ्यांनी १८ दिवस आमरण उपोषण केले होते. त्यानंतर गुजरात सरकारने नुकसानभरपाईबाबत सुधारित प्रस्ताव दिल्याचे वृत्त आहे. मात्र, तो प्रस्ताव अपुरा असल्याचे सांगत शेतकऱ्यांनी तो स्वीकारण्यास नकार दिला. उपोषण मागे घेतले असले तरी गांधीवादी मार्गाने आंदोलन आणि पदयात्रा सुरू ठेवण्याचा निर्णय आंदोलकांनी घेतला आहे.

दरम्यान, या प्रकरणी राज्य सरकार आणि अदानी एनर्जी सोल्यूशन्सकडून आंदोलनातील सर्व मागण्यांवर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

## सर्वोच्च न्यायालयाची प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी विशेष मोहीम चार नवीन खंडपीठांची स्थापना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सुमारे ८०० जुन्या खटल्यांचा जलद निपटारा करण्यासाठी सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी चार विशेष विभागीय खंडपीठांची स्थापना केली आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत कामकाजाला सोमवार (दि. १३) पासून सुरुवात झाली.

न्यायालयातील प्रलंबित खटल्यांचा वाढता बोजा कमी करण्याच्या उद्देशाने ही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक खंडपीठाकडे सुमारे २०० जुने खटले सोपविण्यात आले असून त्यांचा प्राधान्याने निपटारा केला जाणार आहे.

योजनेनुसार, न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि न्यायमूर्ती एस. व्ही. एन. भट्टी यांच्या नेतृत्वाखालील दोन खंडपीठे दिवाणी (सिव्हिल) प्रकरणांची सुनावणी करतील.

तर न्यायमूर्ती मनोज मिश्रा आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या नेतृत्वाखालील दोन खंडपीठांकडे फौजदारी (क्रिमिनल) प्रकरणांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

या विशेष खंडपीठांचे कामकाज आठवड्यातून मंगळवार, बुधवार आणि गुरुवार या तीन दिवसांमध्ये होणार आहे. या दिवशी नियमित प्राथमिक किंवा तातडीच्या (मिसलेनिअस) प्रकरणांची सुनावणी होणार नसल्याने खंडपीठांचे संपूर्ण लक्ष केवळ जुन्या प्रलंबित खटल्यांच्या सुनावणीवर केंद्रित राहील.

सर्वोच्च न्यायालयाच्या या उपक्रमामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या खटल्यांच्या निकालाला गती मिळण्याबरोबरच न्यायालयातील प्रकरणांचा अनुशेष कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## गेमिंग झोन की मृत्यूचा सापळा? मुलांच्या सुरक्षेचा मुद्दा विधान परिषदेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजकोट** : येथील गेमिंग झोन दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील गेमिंग झोनच्या सुरक्षिततेचा मुद्दा विधान परिषदेत 'अर्धा तास चर्चा'द्वारे उपस्थित करण्यात आला. विशेषतः मुंबई, पुणे, ठाणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील गेमिंग झोनमधील सुरक्षा व्यवस्थेबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली.

चर्चेदरम्यान, अनेक मुले शाळा बुडवून तसेच घरातून पैसे चोरून गेमिंग झोनच्या आहारी जात असल्याची बाबही मांडण्यात आली. त्यामुळे पालक, प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे नमूद करण्यात आले.

गेमिंग झोनमध्ये अपघात टाळण्यासाठी दरवर्षी फायर ऑडिट बंधनकारक करणे, सीसीटीव्ही यंत्रणेचे प्रभावी आणि थेट मॉनिटरिंग करणे तसेच मॉल आणि गेमिंग झोनमध्ये तातडीच्या वैद्यकीय उपचारांची ('ऑन-द-स्पॉट' मेडिकल ट्रीटमेंट) सक्तीची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली.

या मागण्यांबाबत उद्योगमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित उपाययोजनांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे चर्चेदरम्यान सांगण्यात आले.

## बनावट पत्राद्वारे आयएएस अधिकाऱ्यांच्या मालमत्तेवर दावा; फौजदारी कारवाई रद्द करण्यास उच्च न्यायालयाचा नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : आयएएस अधिकाऱ्यांच्या मालमत्तेवर बनावट पत्राच्या आधारे हक्क सांगितल्याचा आरोप असलेल्या भाडेकरूविरुद्ध दाखल फौजदारी कारवाई रद्द करण्यास इलाहाबाद उच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

उपलब्ध पुराव्यांवरून प्रथमदर्शनी बनावट कागदपत्र तयार करून त्याचा वापर केल्याचे आरोप गंभीर स्वरूपाचे असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

प्रकरणानुसार, भाडेकरूने घरमालकाच्या नावाने कथित बनावट पत्र तयार करून संबंधित मालमत्तेवर स्वतःचा हक्क असल्याचा दावा केला होता. या पत्राचा वापर न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान करण्यात आल्याचा आरोप आहे. त्यानंतर संबंधित आयएएस अधिकाऱ्यांनी फसवणूक आणि बनावट कागदपत्र तयार केल्याप्रकरणी तक्रार दाखल केली.

आरोपीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करून, तक्रारदार आयएएस अधिकारी आणि त्यांच्या पत्नी आयपीएस अधिकारी असल्याने त्यांच्या प्रभावाखाली पोलिसांनी निष्पक्ष तपास न करता आरोपपत्र दाखल केल्याचा दावा केला.

मात्र, हा युक्तिवाद स्वीकारण्यास न्यायालयाने नकार दिला.

न्यायालयाने स्पष्ट केले की, उपलब्ध नोंदींवरून प्रथमदर्शनी फसवणूक आणि बनावट कागदपत्र तयार केल्याचे घटक दिसून येतात. त्यामुळे या टप्प्यावर फौजदारी कारवाई रद्द करण्याचे कोणतेही कारण नसल्याचे सांगत याचिका फेटाळण्यात आली.

प्रकरणाचा अंतिम निकाल खटल्यातील पुरावे आणि सुनावणीच्या आधारे निश्चित होईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

## पंजाबमधील बेपत्ता व्यक्तींच्या प्रकरणांची 'लोक आयोगामार्फत' चौकशी करा; जसवंत सिंह खळरा यांच्या पत्नीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अमृतसर** : पंजाबमध्ये १९८० आणि १९९० च्या दशकात कथितरित्या बेपत्ता झालेल्या व्यक्ती आणि बेवारस म्हणून अंत्यसंस्कार करण्यात आलेल्या मृतदेहांच्या प्रकरणांची स्वतंत्र 'लोक आयोगा'मार्फत (झशेश्रिशी ेउाळीीळेप) चौकशी करण्यात यावी, अशी मागणी प्रसिद्ध मानवाधिकार कार्यकर्ते दिवंगत जसवंत सिंह खळरा यांच्या पत्नी परमजित कौर खळरा यांनी केली आहे.

परमजित कौर खळरा यांनी म्हटले की, अनेक पीडित कुटुंबांना आजही पूर्ण न्याय मिळालेला नाही. त्या काळातील घटनांचे संपूर्ण सत्य समोर आणण्यासाठी आणि पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी सरकारपासून स्वतंत्र व विश्वासार्ह आयोगाची आवश्यकता आहे. जसवंत सिंह खळरा यांनी



१९९० च्या दशकात पंजाबमधील कथित मानवाधिकार उल्लंघनांची प्रकरणे उघडकीस आणली होती. त्यांच्या संशोधनात अनेक व्यक्तींचे मृतदेह कथितरित्या बेवारस म्हणून अंत्यसंस्कार करण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. या प्रकरणांमुळे देशभरात मोठी चर्चा झाली होती. १९९५ मध्ये जसवंत सिंह खळरा यांचे अपहरण होऊन त्यांची हत्या झाल्याचे प्रकरणही देशभर गाजले. त्यानंतर परमजित कौर खळरा यांनी न्यायासाठी दीर्घ कायदेशीर लढा दिला. या प्रकरणात अनेक पोलिस अधिकाऱ्यांना न्यायालयाने दोषी ठरवत शिक्षा सुनावली होती.

दरम्यान, जसवंत सिंह खळरा यांच्या संघर्षावर आधारित 'सतलुज' हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर पंजाबमधील त्या काळातील कथित मानवाधिकार उल्लंघनांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. या पार्श्वभूमीवर परमजित कौर खळरा यांनी सत्यशोधनासाठी स्वतंत्र लोक आयोगाची स्थापना करण्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला आहे.

## चंदीगडमध्ये चार डस्टबीन प्रणाली लागू; नियमभंग केल्यास १४ हजार रुपयांपर्यंत दंड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड** : शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी चंदीगड महानगरपालिकेने (एमसी) नवीन 'चार डस्टबीन प्रणाली' (४-इळप ड्रीशा) लागू केली आहे. या नियमानुसार नागरिकांना घरातच कचऱ्याचे चार वेगवेगळ्या प्रकारांत वर्गीकरण करून संबंधित रंगांच्या डस्टबीनमध्ये साठवणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापूर्वी अस्तित्वात असलेल्या दोन डस्टबीन पद्धतीऐवजी ही नवी प्रणाली लागू करण्यात आली आहे.

नव्या नियमांनुसार हिरव्या डस्टबीनमध्ये ओला किंवा सेंद्रिय कचरा, निळ्या डस्टबीनमध्ये सुका कचरा, काळ्या डस्टबीनमध्ये ई-कचरा, बॅटऱ्या, ट्युबलाईट्स आणि कालबाह्य औषधांसारखा घरगुती घातक कचरा, तर लाल डस्टबीनमध्ये डायपर्स, सॅनिटरी नॅपकिन्स आणि वापरलेले बँडेज यांसारखा सॅनिटरी कचरा वेगळा जमा करावा लागणार आहे. महानगरपालिकेने कचऱ्याचे योग्य वर्गीकरण न करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. निवासी भागातील नागरिकांनी मिश्र कचरा दिल्यास सुरुवातीला ५०० रुपयांचा दंड आकारला जाईल. तर व्यावसायिक आस्थापनांनी नियमांचे उल्लंघन केल्यास १३,५०० ते १४,००० रुपयांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे.महानगरपालिकेच्या मते, कचऱ्याचे स्रोतावरच वर्गीकरण झाल्यास पुनर्वापर (रिसायकलिंग), सेंद्रिय खत निर्मिती आणि घातक कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट अधिक प्रभावीपणे लावता येईल. या नव्या प्रणालीमुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा होण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळेल, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे. .

## तामिळनाडूतील गोहत्याबंदीच्या मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाची अंतरिम स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : तामिळनाडूमध्ये गायी आणि वासरांच्या कत्तलीवर संपूर्ण बंदी घालण्याच्या मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने प्राथमिक सुनावणीनंतर हा आदेश देत संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावली.

मद्रास उच्च न्यायालयाने २७ मे रोजी दिलेल्या आदेशात तामिळनाडू सरकारला बकरी ईदसह कोणत्याही दिवशी राज्यात गायी आणि वासरांची कत्तल होणार नाही, याची खात्री करण्याचे निर्देश दिले होते. या आदेशाविरोधात तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (एसएलपी) दाखल केली होती. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने प्रथमदर्शनी उच्च न्यायालयाच्या आदेशात सुधारणेची गरज असल्याचे निरीक्षण नोंदवत आदेशाच्या अंमलबजावणीला अंतरिम स्थगिती दिली. तामिळनाडू सरकारने न्यायालयात मांडलेल्या युक्तिवादानुसार, 'तामिळनाडू प्राणी जतन कायदा, १९५८' अंतर्गत विशिष्ट वयोगटातील तसेच काम किंवा प्रजननासाठी कायमस्वरूपी अयोग्य ठरलेल्या जनावरांच्या कत्तलीला कायद्यानुसार परवानगी आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाचा सरसकट बंदीचा आदेश विद्यमान कायद्याशी विसंगत असल्याचा दावा सरकारने केला.

## बद्रीनाथ धामातील देणगी घोटाळा : श्रद्धेच्या पेटीतच हात? व्यवस्थापन, देखरेख आणि उत्तरदायित्वावर गंभीर प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : उत्तराखंडमधील जगप्रसिद्ध श्री बद्रीनाथ धामातील देणगी व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे प्रकरण समोर आले आहे. मंदिराच्या दानपेटीतील रोख रक्कम, सोन्या-चांदीची नाणी आणि इतर मौल्यवान वस्तूंच्या कथित गैरव्यवहाराप्रकरणी बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीच्या (इघढउ) अध्यक्षांच्या वैयक्तिक सहाय्यक (पीए) प्रमोद नौटियाल याला चामोली पोलिसांनी अटक केली आहे. मात्र या अटकेपलीकडे जाऊन अनेक मूलभूत प्रश्न उपस्थित होत आहेत. एखाद्या व्यक्तीवर आरोप झाल्याने प्रकरण संपत नाही; उलट अशी घटना घडूच कशी शकली, याचे उत्तर व्यवस्थापनाला द्यावे लागेल.

२ जुलै रोजी दानपेटीतील रकमेची मोजणी सुरू असताना कथित अनियमितता आढळल्याचे सांगितले जाते. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये संबंधित कर्मचाऱ्याकडून देणगीतील रोख रक्कम व मौल्यवान वस्तू स्वतःच्या कार्यालयात नेल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याचा पोलिसांचा दावा आहे. त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले आणि पुढे डेहराडून येथून अटक करण्यात आली. या प्रकरणाचा तपास आता विशेष तपास पथकाकडे (ड्खढ) सोपविण्यात आला आहे.

परंतु येथे सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, मंदिरातील देणगी मोजण्याची प्रक्रिया नेमकी किती सुरक्षित आहे? एका व्यक्तीला देणगीतील रोख रक्कम किंवा मौल्यवान वस्तूंना सहज हात लावण्याची संधी कशी मिळाली? मोजणीच्या वेळी बहुपदरी नियंत्रण व्यवस्था, स्वतंत्र लेखापरीक्षण, डिजिटल नोंदी आणि सतत देखरेख यांसारख्या यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत होत्या का?

दरवर्षी लाखो भाविक बद्रीनाथ धामात श्रद्धेने देणगी अर्पण करतात. ही देणगी केवळ आर्थिक व्यवहार नसून ती भाविकांच्या विश्वासाची ठेव असते. त्यामुळे तिच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अत्यावश्यक आहे. अशा परिस्थितीत कथित गैरव्यवहार उघडकीस येणे ही केवळ एका कर्मचाऱ्याची बाब म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही.

प्रश्न मंदिर समितीच्या अंतर्गत नियंत्रण व्यवस्थेचाही आहे. नियमित लेखापरीक्षण होत होते का? सीसीटीव्ही फुटेजचे सातत्याने परीक्षण केले जात होते का? सुरक्षा आणि आर्थिक नियंत्रणाच्या नियमांचे पालन प्रत्यक्षात कितपत होत होते? गैरव्यवहार उघडकीस येईपर्यंत कोणत्याही अधिकाऱ्याच्या निदर्शनास संशयास्पद हालचाली का आल्या नाहीत? या प्रश्नांची उत्तरे तपासाइतकीच महत्त्वाची आहेत.

सरकारच्या देखरेखीबाबतही चर्चा अपरिहार्य ठरते. उत्तराखंडमधील प्रमुख धार्मिक संस्थांच्या प्रशासनावर राज्याच्या विविध यंत्रणांची देखरेख असते. अशा संवेदनशील संस्थांमध्ये आर्थिक व्यवहारांची पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी नियमित तपासणी, स्वतंत्र लेखापरीक्षण आणि तांत्रिक सुरक्षा व्यवस्था कितपत प्रभावी आहे, याचे पुनर्मूल्यांकन करण्याची वेळ आली आहे. केवळ घटना उघड झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा अशा घटना होऊच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक यंत्रणा अधिक सक्षम असणे गरजेचे आहे.

तपास यंत्रणांनी आरोपीला अटक करून पुढील चौकशी सुरू केली आहे. मात्र या प्रकरणात इतर कोणाचा सहभाग होता का, नियंत्रण व्यवस्थेत त्रुटी होत्या का किंवा ही एकट्या व्यक्तीची कथित कृती होती, हे तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे. न्यायालयीन प्रक्रियेपूर्वी कोणालाही दोषी ठरविणे योग्य नाही; मात्र व्यवस्थेतील उणिवांकडे दुर्लक्ष करणेही तितकेच धोकादायक ठरेल.

बद्रीनाथसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रातील प्रत्येक रुपया आणि प्रत्येक देणगी ही भाविकांच्या विश्वासाचे प्रतीक आहे. त्यामुळे या प्रकरणात केवळ आरोपीवर कारवाई करून विषय संपणार नाही. तपास निष्पक्ष, पारदर्शक आणि सर्वसमावेशक व्हावा, जबाबदारी निश्चित व्हावी आणि भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी मजबूत व्यवस्था उभी राहावी, हीच भाविकांची अपेक्षा आहे.